# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८/०२/२०१९ रोजी (का.प.क्र.२३) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक १८/०२/२०१९ रोजी (का.प.क्र.२३) मा.सभापती श्री.रेणुकादास(राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:४५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.उपआयुक्त(महसुल), नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०६. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०७. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०८. स.स.श्री.पुनमचंद सोनाजी बमणे
०९. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
१०. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
११. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
१२. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१३. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्री.गजानन बारवाल : १४ फेब्रुवारी रोजी पुलवामा येथील पाकिस्तानी दहशतवादी हल्ल्यामध्ये ४० जवान शहिद झाले आणि आज सुध्दा चार जवान शहिद झाले आहे. शहिद झालेल्या जवानांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

(जो श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडला त्यास श्रीमती.स्वाती नागरे, स.शिल्पाराणी वाडकर, स.जयश्री कुलकर्णी, सायरा बानो, श्री.अब्दुल नविद अनुमोदन देतात.)

मा.सभापती : पुलवामा मध्ये जो मोठा अतिरेकी हल्ला झाला त्यामध्ये ४४ जवान शहिद झाले. या घटनेचा सभागृहातर्फे निषेध करतो. या सर्व शहिद झालेल्या जवानांना सभागृहातर्फे २ मि. उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

(यावेळी शहीद जवानांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : गेल्या तीन मिटींग पासुन दुषित पाण्याबाबत बोलत आहे. आज नागरीकांनी येत असलेले दुषित पाणी आणुन दिले. अतिशय संत गतीने काम चालु आहे. दुषित पाण्याचा प्रश्न सुटत नाही.

कार्य.अभियंता(पा.पु) :नळजोडणी तपासणीचे काम चालु आहे.प्रत्येक नळ जोडणी खोदुन तपासावी लागत आहे.

उपअभियंता(पा.पु) : दहा ठिकाणी खड्डे केले आहे अजुन ही कंन्टेमनेशन सापडलेला नाही. आजही काम सुरु आहे.

मा.सभापती : कर्मचारी वाढवुन ताबडतोबीने दुषित पाण्याचा प्रश्न सोडवण्यात यावा.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : सुलभ शौचालयात अजुन पाण्याची व्यवस्था झालेली नाही.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : एन-५ मधुन एक टँकर सुलभ शौचालय यासाठी चालु आहे. दिड महिन्यापासुन पाण्यासाठी पाणी पुरवठा विभागामध्ये फाईल पाठवलेली आहे. कनेक्शन देत नाही.

उपअभियंता(पा.पु) : प्लम्बंर मार्फत कनेक्शनसाठी अर्ज दाखल केला तर त्याला लगेच मंजुरी देण्यात येईल.

मा.सभापती : श्री.अफसर यांनी ताबडतोबीने एजन्सीला नळ कनेक्शनसाठी अपलाय करायल सांगावे, श्री.फालक मंजुर करुन देतील.

श्रीमती.स्वाती नागरे : सिडको हडकोतील एन-५ आणि एन-७ च्या पाण्याच्या टाक्या उशिरा भरण्यात येतात त्यांना आधी प्राधान्य देण्यात यावे. आणि रोज चार तास पाणी पुरवठा का बंद असतो त्याची माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता(पा.पु) : पाणी पुरवठा संदर्भात चार तास फक्त एक दिवस इलेक्ट्रिक्लचा फॉल्ट आलेला होता. सप्लायच्या बाबतीत कुठलीच अडचण आलेली नाही.

श्रीमती.स्वाती नागरे : कुठलीच अडचण नसल्यावर पाणी पुरवठा विस्कळीत का होतो?

कार्य.अभियंता(पा.पु) : आमच्याकडे फक्त एकच डेप्टी इंजिनिअर आहे.

मा.सभापती : आपल्याकडे मनुष्य बळ नाहीत याबाबत तुम्ही वरिष्ठांना कळवले का?

कार्य.अभियंता(पा.पु) : याबाबत पत्र दिलेले आहेत.

मा.सभापती : त्याची एक प्रत मला देण्यात यावी. आणि पाणी पुरवठ्याच्या बाबतीत विस्कळीत पणा येणार नाही याकडे लक्ष द्यावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : प्रत्येक बैठकीमध्ये होर्डिंगच्या संदर्भात माहिती विचारते. कोणतीच माहिती दिली जात नाही.

मालमत्ता अधिकारी : सेक्शन मधुन माहिती सदस्यांना पाठवलेली आहे.

मा.सभापती : त्याची फाईल मागवुन घेण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल : या सदंर्भानेच सिध्दार्थ गार्डन येथील पार्किंगच्या विषय प्रत्येक बैठकीत बोलत आहे त्याची सुध्दा माहिती दिली जात नाही.

उपअभियंता(श्री.खमर) : मागच्या बैठकीमध्ये या संदर्भात सविस्तर माहिती सभागृहात दिली होती. बीओटी विभाग हा माझ्याकडे नाही. सध्या शहर अभियंता श्री.एस.डी.काकडे आणि श्री.फेले यांच्याकडे १५ तारखेला ऑर्डर निघालेली आहे. ३२ लाख ४० हजार रु. त्या व्यक्तीकडे बाकी आहे. त्याकरिता पत्र सुध्दा दिलेले आहे. दोन वर्षाचे थकबाकी त्याच्याकडे आहे.

श्री.गजानन बारवाल : त्याची माहिती सभागृहात कोणकडेच नाही. दोन वर्षापासुन थकबाकी असल्यामुळे ते सिल करण्यात यावे.

शहर अभियंता : आजच ती फाईल बघुन घेतो आणि त्यामध्ये योग्य ती कारवाई करतो.

मा.सभापती : ताबडतोबीने ते भाडे वसुल झाले पाहिजे अन्यथा सिल करण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल : मागच्या आठवड्यामध्ये काही बिलाचे पैसे देण्यात आले आहे त्याची माहिती देण्यात यावी.

प्र.मुख्यलेखाधिकारी : पहिल्यांदा वाटरवर्कचे पावनेदोन कोटीचे चेक काढले होते. नंतर ड्रेनेज, आणि सिनियारिटी लिस्ट तीन महिन्याचे आणि कार्पोरेटर फंड मधील काही चेक अशा पध्दतीने जवळपास साडे पाच सहा कोटीचे चेक काढले होते. या सिनियारिटी लिस्टमध्ये जे उपलब्ध फंड असेल ते गुप्तेदारांना पैसे द्यायला पाहिजे असे मा.आयुक्तांचे आदेश आहेत.

श्री.गजानन बारवाल : यावर ऑडिट करण्यात यावे. सिनियारिटी काय आहे आणि याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : आता पर्यंत किती कामाचे बिल काढले आहेत.

प्र.मुख्यलेखाधिकारी : एप्रिल पासुन आता पर्यंत ४७६ कोटीचे देयक देण्यात आले आहे.

मा.सभापती : या विभागात तुम्ही जॉईन झाल्यापासुन किती देयक देण्यात आली आहे.

प्र.मुख्यलेखाधिकारी : पुर्ण देयक किती दिले आहेत ते बघुन सांगतो.

मा.सभापती : या विभागात श्री.पाटणी जॉईन झाल्या पासुन ते आता पर्यंत जे चेक काढलेले आहेत ते कुठल्या निकशावर काढण्यात आले आहे? ते निकष योग्य आहे का? ते तपासुन त्याचा अहवाल देण्यात यावा.

श्रीमती.राखी देसरडा : वार्डामध्ये लाईटचा खुप मोठा प्रॉब्लेम आला आहे. रात्रीला लाईट बंद असतात.

कार्य.अभियंता(विद्युत) : टाईमरची व्यवस्था केलेली आहे. दोन चार ठिकाणी प्रॉब्लेम झाला होता आता तो सॉल झाला आहे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : एलईडीची लाईट लावल्यावर दहा दिवसात बंद पडतात. एलईडी लाईटची कॉलिटी चेक केली पाहिजे.

मा.सभापती : सर्व वार्डामधील लाईटचे मन्टेंन्स करण्यात यावे.

श्रीमती.सायरा बानो : मिल कॉर्नरची व्यायाम शाळा खाली करण्यासाठी सांगितले होते. त्याचे काय झाले.

मालमत्ता अधिकारी : आरसीएस-४२३ म्हणुन प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. विधी विभागाशी चर्चा व पडताळणी करुन घेतो.

मा.सभापती : आयुक्तांच्या मंजुरीने खाली करायचे सांगितले होते. जशी मंजुरी झाली तशी कार्यवाही झाली पाहिजे.

श्रीमती.सायरा बानो : पाच फायर स्टेशन मंजुर झाले आहे त्यामध्ये शहागंजचा फायर स्टेशन मंजुर झाला आहे. दिड वर्षापासुन काम सुरु करण्यात आलेले नाही.

अग्निशमन अधिकारी : फायर स्टेशनसाठी श्री.तनपुरे यांची नियुक्ती केलेली आहे.

मा.सभापती : त्यांना बैठक संपल्यावर दालनात बोलावुन घेण्यात यावे.

श्री.ऋषिकेश खैर : समर्थ नगरमध्ये पाच ते सहा ठिकाणी पाण्याची पाईपलाईन टाकायची आहे. २५ लाखाची फाईल अडकलेली आहे.

कार्य.अभियंता(पा.पु) : अकाऊट विभागामध्ये संचिका मंजुरीसाठी पाठवलेली आहे.

प्र.मुख्यलेखाधिकारी : कोणतीच संचिका पेंटीग नाही.

श्रीमती.राखी देसरडा : शहरामध्ये जी ड्रेनेज लाईन वाहते ती आधी नाल्यामधुन जात होती. नाल्याभोवती ज्या वस्ती आहेत त्या लोकांच्या बोरमध्ये नाल्याचे पाणी मिक्स होऊन पाणी येत होते. यावर भारत सरकारने योजना राबवण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये केंद्रसरकार, राज्यसरकार आणि महानगरपालिका तीघांनी मिळुन रु.३६५ कोटीचा प्रोजेक्ट केला होता. ही सदरील योजना मंजुर करतांना प्रशासनाने खुप चांगले प्रेजेंटेशन दिले होते. मागच्या बैठकीमध्ये प्रस्ताव मंजुर केला होता की, ते पाणी समृध्दी योजनेला द्यायचे आहे. समृध्दी योजनेला किंवा गार्डनला, बिल्डर्स लोकांना ते देणार होतो. पण असा एक ट्रिटमेंन्ट प्लॅन झाल्टा कॉर्नरला आहे. ३५एमएलडी पाणी तिथे यायला पाहिजे. माहिती मागवल्यावर तिथे चार ते पाच एमएलडी पाणी जाते आणि त्यावर ट्रिटमेंन्ट होते आणि ते पाणी देतो. पण बाकीच पाणी कुठे जाते? त्याची चौकशी केल्यावर माहिती मिळाली की, शहराच्या आजु बाजूला जी शेती आहे त्या शेतीवर जो भाजी पाला उगवला जातो ते ड्रेनेजच्या पाणीवर होत आहे. याचा परिणाम पुर्ण औरंगाबाद शहराच्या नागरीकांच्या शरीरावर होत आहे. यावर प्रशासनाचे काहीच देखरेख नाही. याची पुर्ण चौकशी केली पाहिजे. सात दिवसात त्याचे ऑडिट केले पाहिजे.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) : झाल्टाच्या जवळपास दिडशे शेतकऱ्यांना पाणी मिळत नव्हते. शेतकऱ्यांनी नाल्यामध्ये दहा-पंचवीस लोकांनी विद्युत मोटारी लावल्या होत्या. त्यांना प्रतिबंध घालण्यासाठी जानेवारी पासुन प्रत्येक वेळी जाऊन ड्रॉईव्ह घेत आहोत. दोन वेळेस मा.उच्च न्यायालयाने आदेशित केले होते. ४० ते ५० पोलिस बंदोबस्त घेऊन कारवाई केली होती. आणि पंचविस विद्युत मोटारी काढुन घेतल्या होत्या. सध्या तिथे ५ एमएलडी पाणी येत आहे. शेतकऱ्यांशी याबाबत संवाद सुध्दा साद्दला होता. मा.महापौरांनी सुध्दा त्यांना समजवले आहे.

मा.सभापती : जो पर्यंत योजनेचे काम पुर्ण होत नाही तो पर्यंत त्यांना पैसे देण्यात येऊ नये. अन्यता त्याला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. उर्वरित कामे महापालिकेच्या फंडातून करावे.

**विषय क्र. २२४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.४६ नवाबपुरा अंतर्गत हिंदी भवन ते श्री.गवळी यांच्या घरापर्यंत व्हाईट टॉपींग करणे बाबत. या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१८-१९ च्या दरसुची डी.एस.आर. नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक रक्कम रूपये ४९,९८,७९८/- यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली

आहे. सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कमे मधुन उपलब्ध करण्यांत येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ४९,९८,७९८/- मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.२२४,२२५,२२६,२२७,२२८,२२९,२३० मंजुर करण्यांत येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४६ नवाबपुरा अंतर्गत हिंदी भवन ते श्री.गवळी यांच्या घरापर्यंत व्हाईट टॉपींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये ४९,९८,७९८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भांडवली कामे सन २०१८-१९ अंतर्गत वार्ड क्र.७८ विद्यानगर भागात गारखेडा जलकुंभापासून राणानगर मुख्य रस्त्यापर्यंत ३०० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे बाबतचे एकूण अंदाजपत्रक रक्कम रूपये ३६,९७,८३९/- चे म.जी.प्रा. दरसुची सन २०१८-१९ नुसार तयार करण्यात आलेले आहे.

करीता अंदाजपत्रक रूपये ३६,९७,८३९/- किमंतीच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथापी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७८ विद्यानगर भागात गारखेडा जलकुंभापासून राणानगर मुख्य रस्त्यापर्यंत ३०० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये ३६,९७,८३९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२६ :**

विषय : क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळयाची उंची वाढविणेसाठी चौथाऱ्याचे बांधकाम करणे व अश्वारूढ पुतळयाची सन्मानजनक पुनःस्थापना करणे या कामाचे ठेकेदार मे.गायत्री आर्किटेक्टस यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.४० टक्के जास्त दराने भरणा केली आहे. प्रकरणी दराच्या वाटाघाटीअंती कंत्राटदाराने सदरील काम ३.४० टक्के जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने करणेस लेखी संमती दिल्यानुसार निविदा र.रू.१,४९,७६,४०४/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.०७/०२/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.०९ |
| २ | कामाचे स्वरुप | क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळयाची उंची वाढविणेसाठी चौथाऱ्याचे बांधकाम करणे व अश्वारूढ पुतळयाची सन्मानजनक पुनःस्थापना करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | १,८४,५३,५७२/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | १,४९,७६,४०४/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई निविदेद्वारे व दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीद्वारे |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०२ फेब्रुवारी २०१९ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०७ फेब्रुवारी २०१९ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.गायत्री आर्किटेक्ट्स | १,४९,७६,४०४/- | ३.४० टक्के जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे. | सदर कामासाठी कंत्राटदार मे.गायत्री आर्किटेक्टस यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.४० टक्के जास्त दराने निविदा सादर केली आहे. संबंधीत कंत्राटदारास दराच्या वाटाघाटी बाबत समक्ष विचारणा केली असता, संबंधीतांनी सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेस लेखी संमती दिली आहे. |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शहर सौंदर्यीकरण |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.सर्वसाधारण सभा दि.१६/०१/२०१९ (दि.१७/०१/२०१९ का.प.क्र.२४ रोजीची सभा) विषय क्र.८३७ |
| तरी विषयाकिंत काम कंत्राटदार मे.गायत्री आर्किटेक्टस यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.१,४९,७६,४०४/- पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर. | | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याची उंची वाढविणेसाठी चौथाऱ्याचे बांधकाम करणे व अश्वारूढ पुतळ्याची सन्मानजनक पुनःस्थापना करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.गायत्री आर्किटेक्टस यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.१,४९,७६,४०४/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २२७ :</u>**

विषय : झोन क्र.८ कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.११४,११५ मधील रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे या कामाचे कंत्राटदार मो.अहेमद सिद्दीकी यांचेकडून उपलब्ध तरतुद म्हणजेच र.रू.४६,११,०००/- एवढ्या मर्यादेपर्यंतच करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-AMCA-256549-२ सन २०१७-२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-२ महानगरपालिका औरंगाबाद |
| २ | कामाचे स्वरुप | झोन क्र.८ कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.११४,११५ मधील रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | ४९९७३५०.००/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ४९९४१५०.७०/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २०/११/२०१७ ते ०५/१२/२०१७ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मो.अहेमद सिद्दीकी | ५२७९८१६.१२ | ५.०० टक्के जास्त दराने (मुळ निविदा ५.७२ टक्के दराने भरणा केली होती तथापी वाटाघाटी अंतर्गत संबंधीत कंत्राटदार यांनी ५ टक्के जास्त दराने काम करणेस सहमती दर्शविली आहे.) |
| ०२. | व्हि.बी.ए.इन्फ्रा | ५३८६६९०.९५ | ७.८६ टक्के जास्त दराने |
| ०३. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | ५४२६६४४.१५ | ८.६६ टक्के जास्त दराने |

(सर्वात कमी दराची निविदा मो.अहेमद सिद्दीकी यांची असून त्यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.७२ टक्के जास्त दराने आहे. तथापी वाटाघाटी अंतर्गत कंत्राटदाराने अं.प. दरापेक्षा ५ टक्के जास्त दराने काम करण्यास संमती दिलेली आहे. परंतु लेखा विभागाने परिच्छेद क्र.५ नुसार उपलब्ध तरतूद ४६.११ लक्ष च्या मर्यादेत खर्च करण्याच्या अटीवर मान्यता प्राप्त असल्यामुळे एवढ्या मार्यादेपर्यंत खर्च करण्यात येईल.)

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | (१) रस्ते देखभाल दुरूस्ती |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |
| तरी विषयाकिंत प्रकरणी कंत्राटदार मो.अहेमद सिद्दीकी यांचेकडून उपलब्ध तरतूद म्हणजेच र.रू.४६,११,०००/- एवढ्या मार्यादेपर्यंतच करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.८ कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.११४,११५ मधील रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक कंत्राटदार मो.अहेमद सिद्दीकी यांचेकडून उपलब्ध तरतुद म्हणजेच र.रू.४६,११,०००/- एवढ्या मर्यादेपर्यंतच करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२८ :**

विषय : वार्ड क्र.११२ शिवाजीनगर अंतर्गत साईनगर,भारतनगर येथे १०० मीमी व १५० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे तसेच देशमुखनगर जलकुंभापासून ३०० मीमी व्यासाची डीआयके-७ जलवाहीनी टाकणे बाबत.(दलित वस्ती सुधार योजना सन २०१७-१८ मधुन)

संदर्भ : Tender ID- 2018-AMCA-353334-4

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| २ | कामाचे स्वरुप | नवीन जलवाहीनी टाकणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, रूपये ४९,९९,५७८/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये ३७,६१,५०३/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | www.mahatenders.gov.in<br>30/11/2018 |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०६/१२/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १०/१२/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली. | १ (एक) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| ०२. | मे.नुर कन्स्ट्रक्शन | ५२,२८,४८९/- | ३९ टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय?<br>ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? असल्यास कारणे नमुद करावीत. | होय, बाजारात डी.आय.के.-७ पाईपचे वाढीव दर पहाता सीएमआर दराने आलेले दर विचारात घेऊन दरनिश्चितीकरण समितीने मान्य केलेल्या दराने. |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे.<br><br>अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | दलित वस्ती सुधार योजना सन २०१७-१८ अंतर्गत प्राप्त निधी मधुन + अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा पहाता वाढीव खर्च महानगरपालिकेच्या निधी मधून. |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | --- |

तरी विषयांकित कामासाठी चौथ्या वेळेस मागविलेल्या ई-निविदे अंतर्गत एक निविदा प्राप्त झालेली असून सक्षम ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९ टक्के जास्त दराची निविदा प्राप्त आहे. बाजारात डी.आय.के.-७ पाईपचे असलेले वाढीव दर पहाता पाईप करीता सी.एम.आर. दराने व इतर बाबींकरीता मजीप्रा दरसुची सन २०१८-१९ नुसार या कामाच्या निविदेचे मुल्यांकन केले असता, दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.१२ टक्के जास्त येतात. या संदर्भाने दर निश्चीतीकरण समिती समोर दराबाबत वाटाघाटी होऊन कंत्राटदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९ टक्के जास्त दरा ऐवजी २८ टक्के जास्त दराने काम करण्यास लेखी सहमती दिलेली आहे. तरी सक्षम ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८ टक्के जास्त म्हणजेच र.रू.४८,१४,७२४/- पर्यंत काम करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.११२ शिवाजीनगर अंतर्गत साईनगर,भारतनगर येथे १०० मीमी व १५० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहीनी टाकणे तसेच देशमुखनगर जलकुंभापासून ३०० मीमी व्यासाची डीआयके-७ जलवाहीनी टाकणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.नुर कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९ टक्के जास्त दरा ऐवजी २८ टक्के जास्त दराने म्हणजेच र.रू.४८,१४,७२४/- पर्यंत काम करून घेण्यास व करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२९ :**

विषय : वॉर्ड क्र.१३ भीमनगर उत्तर भावसिंगपुरा येथे प्रस्तावित भीमाकोरेगांव येथे असलेल्या विजय स्तंभाची प्रतिकृती उभारणे व परिसर विकसीत करणे या कामाचे ठेकेदार मे.विक्रम कन्स्ट्रक्शन कंत्राटदार यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२० टक्के कमी दराची निविदा टेंडर रक्कम रू.२६,११,४३६+१२ टक्के जीएसटी रू.३,१३,३७२+ आर्किटेक्ट १.५० टक्के रू.४३,८७२ = रू.२९,६८,६८०/- पर्यंत करून घेणेस टेंडर अटी/शर्तीतील व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.२०१८-AMCA-314959-७ दि.०१/०८/२०१८

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.१३ भीमनगर उत्तर भावसिंगपुरा येथे प्रस्तावित भीमाकोरेगांव येथे असलेल्या विजय स्तंभाची प्रतिकृती उभारणे व परिसर विकसीत करणे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय,<br>रक्कम रू.२९,७४,६२९/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | २६,१६,६६९/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग प्रसिध्दीचा दि.२३/०७/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ३०/०७/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०१/०८/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.विक्रम कन्स्ट्रक्शन | २६,१६,६६६.०० | अं.प.दरापेक्षा ०.२० टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण या लेखाशिर्षाखाली करण्यात येणार आहे. |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | लेखा विभाग, महानगरपालिका औरंगाबाद |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

विषयाकिंत कामासाठी ठेकेदार मे.विक्रम कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांची ०.२० टक्के कमी दराची निविदा प्राप्त आहे. सदरील कामासाठी दि.०६/०२/२०१९ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत स.नगरसेविका सौ.आशाताई विजय निकाळजे यांनी उपस्थितीत केलेल्या प्रश्नावर चर्चा झाली असून प्रशासनाने निदर्शनास आणले की, सदरील स्तंभाचे काम सुरू करण्यापूर्वी मा.पोलीस आयुक्त आणि मा.जिल्हाधिकारी यांनी त्यांचे ना-हरकत घेण्यास कळविले आहे. अशा परिस्थितीमध्ये या विषयावर चर्चा होऊन स.नगरसेविका यांनी म्हटले की, परिसर विकसीत करण्याची कामे सुरू करण्याची मान्यता मिळावी आणि विजय स्तंभाचे काम मा.जिल्हाधिकारी आणि मा.पोलीस आयुक्त यांचे ना-हरकत पत्र प्राप्त झाल्यानंतर करता येतील. प्रकरणी प्रथमतः परिसर विकास कामे करणे, स्तंभाचे काम मा.जिल्हाधिकारी आणि मा.पोलीस आयुक्त कार्यालयाकडून ना-हरकत मिळाल्यानंतरच सुरू करण्याच्या अटीवर प्रस्तावित संबंधीत ठेकेदार मे.विक्रम कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेकडून ०.२० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२६,११,४३६+१२ टक्के जीएसटी रू.३,१३,३७२+आर्किटेक्ट १.५० टक्के रू.४३,८७२= रू.२९,६८,६८०/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी /शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

श्री.गजानन बारवाल : सदरील विषय मंजूर करीत असतांना यामध्ये मा.जिल्हाधिकारी व मा.पोलीस आयुक्त यांची परवानगी घेण्याबाबत सूचविलेले आहे, सदरील परवानगी घेऊनच काम चालु करण्यांत यावे. विषय मंजूर करणेस हरकत नाही.

मा.सभापती : स.सदस्य यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे मा.आयुक्त यांनी ज्या सूचना दिल्या आहेत, त्याप्रमाणे विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१३ भीमनगर उत्तर भावसिंगपुरा येथे प्रस्तावित भीमाकोरेगांव येथे असलेल्या विजय स्तंभाची प्रतिकृती उभारणे व परिसर विकसीत करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक ठेकेदार मे.विक्रम कन्स्ट्रक्शन कंत्राटदार यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.२६,११,४३६+१२ टक्के जीएसटी रू.३,१३,३७२+आर्किटेक्ट १.५० टक्के रू.४३,८७२ =

रू.२९,६८,६८०/- पर्यंत करून घेणेस टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार यामध्ये मा.जिल्हाधिकारी व मा.पोलीस आयुक्त यांची परवानगी घेण्याबाबत मा.आयुक्त यांनी सूचविलेले आहे, सदरील परवानगी घेऊनच काम चालु करण्यांत यावे या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३० :**

विषय : वॉर्ड क्र.६५ मधील एन-१ पोलीस चौकी ते सिडको बस स्थानक ते जालना रोड अक्षयदिप बिल्डींग या सर्व्हीस रोडचे डांबरीकरण करणे अं.प. सार्वजनिक बांधकाम विभाग दरसुची २०१५-१६ नुसार र.रू.४७,२७,९००/- चे तयार केलेले आहे. त्याची निविदा रक्कम रू.४४,३५,१४१/- असून त्यानुसार निविदा मागविली असता ची तिसऱ्या वेळेस दि.२०/११/२०१८ च्या निविदेकरीता ठेकेदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने निविदा प्राप्त झाली. वाटाघाटीअंती सदर कामाकरीता ठेकेदार यांनी १.५० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये ४५,०२,६८१.४७/- पर्यंत करून घेण्यासाठी निविदेस सहमती दिली आहे. प्राप्त आहे. करीता निविदा मान्य करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.२०१८-AMCA-344041-१ सन २०१८-२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.६५ मधील एन-१ पोलीस चौकी ते सिडको बस स्थानक ते जालना रोड अक्षयदिप बिल्डींग या सर्व्हीस रोडचे डांबरीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती मान्यता ठराव विषय क्र.२७ दि.१०/०७/२०१८ र.रू.४९,७०,८००/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रक्कम रू.४५,०२,६८१.४७/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई-टेंडर |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०५/०९/२०१८ ते १४/०९/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २०/११/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | ए.एस.कन्स्ट्रक्शन | ४५०२६८१.४७ | अंदाजपत्रकीय दराने |
| ०२. | श्री.शेख शहाबाज शेख नवाब | ४५०२६८१.४७ | ५.५५ टक्के जास्त दराने |
| ०३. | मे.महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन कंपनी | ४५०२६८१.४७ | ४.९९ टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |
| तरी विषयाकिंत प्रकरणी ठेकेदार मे.ए.एस.कंन्स्ट्रक्शन यानी अंदाजपत्रकीय दराने निविदा दाखल केली होती. तथापी चालू एस.एस.आर. २०१८-१९ शी तुलना केली असता, हे दर १.४१ टक्के कमी येतात (विना जीएसटी) | | |

याबाबत कंत्राटदार यांना विचारणा केली असता, वाटाघाटीअंती कंत्राटदार यांनी हे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५० टक्के कमी म्हणजेच टेंडर रक्कम रूपये ४४,३५,१४१/- ने करण्यास सहमती दर्शविलेली आहे. तरी १.५० टक्के कमी दराने हे काम करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता होणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६५ मधील एन-१ पोलीस चौकी ते सिडको बस स्थानक ते जालना रोड अक्षयदिप बिल्डींग या सर्व्हीस रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५० टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये ४४,३५,१४१/- पर्यंत करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

